सहकारी साखर कारखाने
२०१८-२०१९ वर्षाकरिता सतत व समवर्ती लेखापरिक्षण कर्मचारी वर्ग पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः ससाका-२०१८/प्र.क्र.६९/२५स,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०९.०३.२०१८

वाचा -

१) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र.राजस-१००८/प्र.क्र.५३८/५-स, दिनांक ०५.०५.२०११.

२) वित्त विभाग शासन निर्णय क्र: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.०८.०१.२०१८.

३) सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र.ससाका-२०१७/प्र.क्र.४५/२५-स, दिनांक १८.०१.२०१८.

४) वित्त विभाग शासन निर्णय क्र :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.०५.०३.२०१८.

५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.आस्थापना/कक्ष ४/साखर कारखाना/मुदतवाढ/१७५५/२०१८, दि.०१.०३.२०१८.

प्रस्तावना -

उपरोक्त वाचा-३ येथील दि.१८.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे सतत व समवर्ती लेखापरिक्षण करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली २५५ अस्थायी पदे दि.२८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. आता, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाने दि.०१.०३.२०१८ च्या पत्रान्वये सदर २५५ अस्थायी पदे दि. ०१.०३.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ पर्यन्त चालू ठेवण्यास मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार सद्यस्थितीत सदर २५५ अस्थायी पदे दिनांक ०१.०३.२०१८ पासून दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

उपरोक्त वाचा क्र. ३ येथील दि.१८.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे सतत व समवर्ती लेखापरिक्षण करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली २५५ अस्थायी पदे दि.२८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. आता सहकार आयुक्त, पुणे यांचे दि.०१.०३.२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावातील खाली नमूद २५५ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात कार्यासन (आस्था १) आणि कार्यासन (५ स) या कार्यासनांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या आस्थापनेवरील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. यानंतर सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याकरिता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. कार्यासन (आस्था १) आणि कार्यासन (५ स) यांनी

प्रशासकीय विभागाच्या (खुद्द) आस्थापनेवरील पदांचा तसेच, त्यांच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा घेऊन , सुधारीत आकृतीबंधास प्रस्ताव तातडीने वित्त विभागास सादर करण्याचे नियोजन करुन त्वरित कार्यवाही करावी व सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची दक्षता घ्यावी.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	एकूण पदे
१	विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१	१५६००-३९१००+ग्रेड पे रु.५४००	३१
२	लेखा परिक्षक, श्रेणी -१	९३००-३४८००+ग्रेड पे रु.४३००	७०
३	लेखा परिक्षक, श्रेणी -२	९३००-३४८००+ग्रेड पे रु.४२००	६०
४	उपलेखा परिक्षक	५२००-२०२००+ग्रेड पे रु.२४००	१२
५	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००+ग्रेड पे रु.२४००	४२
६	लघुटंकलेखक	५२००-२०२००+ग्रेड पे रु.१९००	४
७	शिपाई	४४४०-७४४०+ग्रेड पे रु.१३००	३६
		एकूण	२५५

२. यावरील खर्च, अर्थसंकल्प लेखाशीर्ष "मागणी क्र. व्ही-२- २४२५, सहकार-१०१, सहकारी संस्थाची लेखापरिक्षा (०१) (०१) लेखापरिक्षेसाठी कर्मचारी वर्ग (२४२५ ०२२७)" या लेखाशीर्षाखाली दाखविण्यात यावा व सन २०१८- २०१९ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.०८/१६/आपुक, दिनांक ०५.०३.२०१८ अन्वये विभागास प्राप्त प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०९१४३७०४८२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2018.03.09 14:38:30 +05'30'

(दि.शि.देसाई)
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे **(५ प्रती)**

२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे **(५ प्रती)**.

३) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ, वर्धा, नागपूर,सांगली, औरंगाबाद, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, उस्मानाबाद, अमरावती, अहमदनगर, नाशिक,सातारा,बुलढाणा,नांदेड, लातूर, धुळे, जळगांव, जालना, परभणी, बीड, अकोला.

४) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यवतमाळ, वर्धा, नागपूर,सांगली, औरंगाबाद, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, उस्मानाबाद,अमरावती,अहमदनगर,नाशिक, सातारा, बुलढाणा, नांदेड, लातूर, धुळे, जळगांव, जालना, परभणी, बीड, अकोला.

५) विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षक), सहकारी संस्था, कोकण विभाग, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती.

६) प्रादेशिक सहसंचालक (साखर) अहमदनगर, औरंगाबाद, नागपूर, नांदेड, कोल्हापूर, पुणे, अमरावती.

७) अपर निबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

८) महालेखापाल -१ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई.

९) वित्त विभाग (विसू -१) / (व्यय २) / (अर्थसंकल्प १९)/(आ.पु.क), मंत्रालय, मुंबई.

१०) सर्व अधिकारी / कार्यासने, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

११)उप सचिव (का.५ स), सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई .

१२)निवड नस्ती (२५-स.)